# देशातील होमिओपॅथीचे पहिले प्रवर्तक छत्रपती राजश्री शाहु महाराज

**बीड (प्रतिनीधी) :-** देशातील पहिला होमिओपॅथीचा सार्वजनीक दवाखाना राजश्री छत्रपती शाहु महाराज यांनी इ.स. 1898 मध्ये कोल्हापूर मध्ये सुरू केला होता. त्यामुळे शाहु महाराज हे देशातील होमिओपॅथीचे पहिले प्रवर्तक आहे असे मत डॉ. अरूण भस्मे यांनी व्यक्त केले ते सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथीक महाविद्यालयात शाहु महाराजांच्या जयंतीनिमीत्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते. प्रारंभी शाहु महाराजांच्या फोटोला पुष्पहार घालुन आदरांजली वाहण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र गौशाल, उपप्राचार्य डॉ गणेश पांगारकर, प्रा.डॉ नितीन राऊत, प्रा. रावसाहेब हंगे, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी हजर होते.

प्लेगची साथ पसरताच राजश्री शाहु महाराजांनी त्यासंबंधी औषधउपचारांची चौकशी करण्यास सुरुवात केली. त्याकाळी ॲलोपॅथीमध्ये औषधी नव्हती मात्र होमिओपॅथीमध्ये प्लेगवर इलाज असल्याची माहिती महाराजांना मिळाली. पंजाबचा सिंह राजा रणजितसिंह यांनी इ.स. 1836 मध्ये डॉ. होनिंगबर्न या जर्मन होमिओपॅथी तज्ञास राजाश्रय देवुन होमिओपॅथीचा भारत प्रवेश घडवुन आणला होता. मात्र महाराजांनी त्यांच्याहीपुढे जात इ.स. 1898 मध्ये कोल्हापुरात होमिओपॅथीचा दवारखाना काढला हा दवाखाना हिंदुस्थानातला पहिला सार्वजनिक होमिओपॅथी दवाखाना म्हणुन ओळखला जातो.

यावेळी बोलतांना डॉ भस्मे यांनी कोरोनापासुन बचाव करण्यासाठी आर्सेनिक प्रसादाप्रमाणे वाटु नका असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

**आर्सेनिक प्रसादाप्रमाणे वाटु नका ...**

कोरोना संक्रमणाच्या काळात आर्सेनिक अल्बम-30 हे औषध रोग प्रतिकारक शक्ति वाढविते व कोरोनापासुन बचाव होतो असे आयुष मंत्रालयनेच स्पष्ट केले आहे. अनेक सामाजिक कार्यक्रर्ते,राजकीय नेत्याचे समर्थक ग्रामसेवक, शिक्षक व बेरोजगार तरुणांनीही हे औषध वितरीत केले आहे. अगदी प्रसाद वाटावा तसे या औषधाचे वाटप सुरू आहे. एका ड्रामच्या बाटलमध्ये साधाराणतः 48 गोळया असतात यातील गोळयात किती औषध टाकायचे याचे प्रमाण ठरलेले आहे हे प्रमाण चुकले तर औषधाचा योग्य परीणाम होत नाही. जेथे 30 एम एल ची मागणी व्हायची तेथे लिटरने आर्सेनिकची मागणी होत आहे त्यामुळे हे औषध कोणी बनवावे कोणी विकावे यावर नियंत्रण नाही लोकही प्रसादासारखे हे औषध खात आहे त्यामूळे याचे दुष्परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही.

केंद्रिय आयुष मंत्रालयने कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनांमध्ये होमिओपॅथीचा समावेश करुन ‘आर्सेनिक अल्बम-30’हे औषध रोगप्रतिकारशक्ति वाढविण्यासाठी उपयुक्त ठरते, असे स्पष्ट केल्यामुळे हे औषध मंत्रालयाची सूचना नागरिकांसह आरोग्य व स्थानिक जिल्हा प्रशासनानेही सुरूवातीच्या काळात फारशी गांभीर्याने घेतली नाही, त्यामुळे केवळ होमिओ फार्मसी आणि डॉक्टारांपर्यतच या औषधाचे वितरण होत होते. कोरोनाचा प्रसार जसजसा वाढला तसतशी औषधांची गरज भासु लागली. भीतीपोटी, काळजीपोटी सर्वच पॅथीच्या प्रतिबंधात्मक औषधांचा वापर होऊ लागला. त्या औषधामध्ये ‘आर्सेनिक अल्बम-30’ हे सर्वात प्रभावी ठरल्याचा दावा करण्यात आल्याने या औषधाची मागणी वाढली आहे.

कोरोनामुळे दुर्लक्षित असलेल्या अनेक गोष्टींना एकदमच झळाळी प्राप्त होउन त्यांची मागणी वाढली आहे. त्यामध्ये सॅनिटायझर, मास्क यांच्या जोडीला होमिओपॅथी औषधांचाही समावेश आहे. एरव्ही साबुदाण्याच्या गोळया म्हणुन ज्या पॅथीला हिणवले जात असे त्याच होमिओपॅथीच्या ‘आर्सेनिक अल्बम-30’ या औषधाला सध्या प्रचंड मागणी आहे. मात्र हे औषध कोणी बनवावे कोणी विकावे, यावर सध्या तरी कोणाचेच नियंत्रण नाही, त्यामुळे प्रसाद वाटावा असे या औषधीचे वितरण होत आहे. अनेक सामाजिक संस्था हे औषध वाटप करीत आहे, सरकारने यावर नियंत्रण आणावे अशी मागणी होत आहे.